**Goan Varta, Wednesday 14 August 2019**

# माती परीक्षण करणे गरजेचे

अक्षय गावकर
सुळकर्णे - केपे



**माती परीक्षण करणे काळाची गरज** आहे. रासायनिक खातांच्या अतिवापरामुळे जमिनिचा पोत खालावत चाललेला आहे. जमिनीतील सुक्ष्मजीवांचे जीवनचक्र बिघडत आहे. त्यामुळे माती परीक्षण करूनच जमिनीला व पिकाला आवश्यक असणाऱ्या खतांचा वापर करणे आवश्यक आहे.

माती परीक्षण म्हणजे काय? शास्त्रीय पद्धतीने शेतातील किंवा बागांमधील माती गोळा करून प्रयोगशाळेत तिच्यातील विविध घटकांची मात्रा पडताळणे होय. यामध्ये जमिनीचा सामू, कर्बाची मात्रा, आवश्यक मूलद्रव्यांची मात्रा (नत्र, स्फूरद व पोटाश) पडताळणे होय. पिकांना आवश्यक तेवढ्या प्रमाणात खतपुरवठा या माती परीक्षणातून ठरवला जातो. या सगळ्यांचा तपशील असलेली पोचपावती म्हणजे जमिनीचे आरोग्य कार्ड

गोव्यामध्ये माती परीक्षण कृषी विज्ञान केंद्रामध्ये केले जाते. प्रत्येक शेतकऱ्यांने आपल्या जमिनीची परीक्षण करणे गरजेचे आहे. दाभाळ, धारबांदोडा येथे राहण्यासाठी आलेले डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांनी, दाभाळ येथील बाबूश गावकर यांच्या बागेत माती गोळा करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. माती गोळा करताना 'व्ही' अशा आकाराने खणून माती गोळा करावी, असे सांगितले.

शेतातील माती १५-३० सेंमी खोलवर तर बागेतील ४०-५० सेंमी खोलवर खणून गोळा करावी. पूर्ण शेत व बागांमधील प्रत्येकी दहा ते बारा जागेवरून माती गोळा करून एकत्र करावी. त्यातील सुमारे एक किलो माती फक्त सावलीत सुकवावी. पूर्णपणे सुकलेली माती कृषी केंद्रात परीक्षण करण्यासाठी द्यावी, असे या कृषीदुतांनी उपस्थित शेतकऱ्यांना पटवून दिले.

**(लेखक कृषी विद्यार्थी आहेत.)**

Wed, 14 August 2019
epaper.thegoan.net/c/42816733